प्रेस नोट

स्थानिक गुन्हे शाखा जळगाव
दिनांक १६.३.२०१७

प्रति,

संपादक

---------------

विषय :- जळगाव जिल्ह्यात घरफोड्या करणारा अट्टल गुन्हेगार स्थानिग गुन्हे शाखा करवी जेरबंद

मा. पोलीस अधिक्षक सो डॉ जालिंदर सुपेकर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेशसिंह चंदेल स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांनी स.पो.नि. प्रकाश एम. वानखेडे, मनोहर देशमुख, दिलीप येवले, अशोक चौधरी, शशिकांत पाटील, रमेश चौधरी, मिलींद सोनवणे, रविंद्र गायकवाड, रामकृष्ण पाटील, महेद्र पाटील, विलास पाटील, योगेश पाटील, सुशिल पाटील, गफ्फार खा तडवी, प्रकाश ब. महाजन, ,मनोज दुसाने, महेश पाटील, नुरोद्दीन शेख चंद्रकांत पाटील, विजय पाटील, दिनेश बडगुजर , नरेंद्र पाटील, विनयकुमार देसले, रविंद्र चौधरी, दिपक पाटील, प्रविण हिवराळे , दर्शन ढाकणे अश्याचे पथक तयार करुन जळगाव शहरात व जिल्ह्यात घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणे करीता पथक तयार केले होते.

दिनांक ९/३/२०१७ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेशसिंह चंदेल स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांना मिळालेल्या माहीती मिळाली की, पारोळा येथिल राहणारा सराईत अट्टल घरफोड्या करणारा गुन्हेगार सुनिल उर्फ सल्या लक्ष्मण पाटील जानेवारी २०१७ मध्ये सुरत सब जेल येथुन पॅरोल रजेवर सुटला असुन तो अद्याप पावेतो जेल मध्ये हजर झालेला नाही तो जळगाव शहरात व जिल्ह्यात असल्याचे समजुन आल्याने वरील पथकास सुनिल उर्फ सल्या लक्ष्मण पाटील याची माहीती काढुन ताब्यात घेणे बाबत सुचना दिल्या वरील पथकाने माहीती काढुन दिनांक १०/३/२०१७ रोजी सुनिल उर्फ सल्या लक्ष्मण पाटील हा जळगाव शहरात विद्युत कॉलनी परिसरात फिरत असल्याचे माहीती मिळाल्याने पथकाने विद्युत कॉलनी परिसर पिंजुन काढुन सुनिल उर्फ सल्या लक्ष्मण पाटील हा विद्युत कॉलनी बस थांबा बोर्डाजवळ नजरेस पडल्याने त्यास पथकाने जागीच सापळा रचुन ताब्यात घेतले त्याची जागीच अंगझडती घेता त्याचे अंगझडतीत लोखंडी टॉमी मिळुन आल्याने ती जप्त करुन त्यास स्थानिक गुन्हे शाखेचे कार्यालयात आणुन त्यास अधिक सखोल विचारपुस करता त्याने प्राथमिक जिल्हापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील बस स्टॅन्ड पाठीमागील ओंकार नगर व पारोळा येथिल बोरी कॉलनी येथिल घरफोडी केल्याचे सांगितल्याने त्यास जिल्हापेठ पोलीस स्टेशन भाग ५ गु.र.न. २२/२०१७ भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० या गुन्ह्यात दिनांक १०/३/२०१७ रोजी अटक करण्यात आली त्यास दिनांक ११/३/२०१७ रोजी मा. न्यायालयात हजर करुन त्याची दिनांक १७/३/२०१७ पावेतो वेळोवेळी ६ दिवस पोलीस कोठडि रिमांड घेण्यात आली आहे.

पोलीस कोठडी रिमांड दरम्यान आरोपी सुनिल उर्फ सल्या लक्ष्मण पाटील वय ३० रा. शनीमंदीराजवळ , अमळनेर रोड , पारोळा यास अधिक पुन्हा ,पुन्हा विचारपुस करुन त्याने जळगाव

शहरात ओंकार नगर, पारोळा याच बरोबर रामानंदनगर पोलीस स्टेशन हद्दीत त्रिमुर्ती कॉलनी पिप्राळा, रायसोनी नगर, पंजाबबर कृषी भवन कॉम्पलेक्स मधील संजीवनी मेडीकल असे एकुण ५ घरफोडी गुन्ह्याची कबुली दिल्याने त्याचे कडुन १) पारोळा येथिल घरफोडीत १४० ग्रॅम सोन्याचे दागीने , १०० ग्रॅम लगड, एक कोडॅक कंपनीचा कॅमेरा असे एकुण ६,७९,९६७/- रुपयाचा माल २) तसेच रामानंद नगर पोलीस स्टेशन हद्दीतील त्रिमुर्ती कॉलनी पिप्राळा घरफोडीतील २०३७० रुपये किमतीचे ७ गॅमचे दागीने ३) तसेच रामानंदनगर मधील रायसोनी नगर मधील घरफोडीतील ३११०० रुपये किमतीचे १० ग्रॅमचे सोन्याची दागीने व २००० रुपय रोख खालील प्रमाणे माल हस्तगत करण्यात आला आहे.४) जिल्हापेठ पोस्टे हद्दीतील नविन बस स्टॅन्ड पाठी मागील घरफोडीतील ६५०० रुपये रोख व १२०० रुपयाची ४० ग्रॅम चांदी ५) जळगाव शहर पोलीस स्टेशन हद्दीतील मेडीकल दुकानाचे घरफोडीतील २०००० रोख रुपये असा ५ घरफोडी चे गुन्ह्यातील २५७ ग्रॅम सोन्याचे दागीने, ४० ग्रॅम चांदीचे शिक्के, २८५०० रुपये रोख व ८००० रुपये किमतीचा कॅमेरा असे एकुण ७,५९,१३७ रुपये किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेशसिंह चंदेल याचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा जळगाव चे पथक करीत आहे.

तसेच आरोपी सुनिल उर्फ सल्या लक्ष्मण पाटील याचे विरुध्द १). पारोळा पोलीस स्टेशन भाग ५ गुरन १२०/११ भा.द.वि.कलम ३०७ २) भडगाव पोलीस स्टेशन गुरन भाग ५ गुरन ३४/११ भा.द.वि.कलम ३८० ३) भद्रकाली पोलीस स्टेशन जिल्हा नाशिक भाग ५ गुरन ७५/२०१२ भा.द.विकलम ३७९ ४) पलसाना (गुजरात) पोलीस स्टेशनभाग ५ गुरन ४८/१२ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे ५) जिल्हापेठ पोलीस स्टेशन भाग ५ गुरन ४/२०१३ भा.द.वि.कलम २२४ प्रमाणे ६) सनावदपुरा (सुरत) पोलीस स्टेशन गुरन १६८/१० भा.द.वि.कलमं ३९५,३०२ प्रमाणे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

(डॉ.जालिंदर सुपेकर)
पोलीस अधिक्षक जळगाव